आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता

१८ जुलै २०२४ - गुरुवार

**ठळक बातम्या**

- नीट – युजी परीक्षेतल्या गैरप्रकारांबाबत दाखल झालेल्या ४० याचिकांवर सर्वोच्च न्यायालयात सुनावणी सुरु

- महाराष्ट्राच्या गडचिरोली जिल्ह्यात पोलिसां - बरोबरच्या चकमकीत १२ नक्षलवादी ठार / तर छत्तीसगडमधे नक्षलविरोधी मोहिमेत २ जवान शहीद, २ जखमी

- बँक घोटाळाप्रकरणी आज दिल्लीसह गुरुग्राम, महेंद्रगड, बहादुरगड आणि जमशेदपुर या शहरात ईडीचे छापे

**आणि**

- आयसीसी टी ट्वेंटी क्रिकेट जागतिक मानांकनं जाहीर

**<><><><><>**

नीट – युजी परीक्षेतल्या गैरप्रकारांबाबत दाखल झालेल्या विविध याचिकांवर सर्वोच्च न्यायालयात आज सुनावणी होत आहे. केंद्रीय अन्वेषण संस्थेने आतापर्यंत झालेल्या चौकशीचा अहवाल न्यायालयात बंद लिफाफ्यात सादर केला. सद्यस्थितीत हा अहवाल जाहीर केल्यास पुढच्या चौकशीवर दुष्परिणाम होऊ शकतो असं सीबीआयचं म्हणणं आहे. सरन्यायाधीश न्यायमूर्ती धनंजय चंद्रचूड, न्यायमूर्ती जे. बी. पारडीवाला आणि न्यायमूर्ती मनोज मिश्रा यांच्या पीठासमोर या ४० याचिकांवर सुनावणी होत आहे.

**<><><><><>**

सर्वोच्च न्यायालयाच्या दोन नवनियुक्त न्यायाधीशांचा शपथविधी आज झाला. न्यायमूर्ती एन कोटीश्वर सिंग आणि न्यायमूर्ती आर महादेवन यांना सरन्यायाधीश न्यायमूर्ती धनंजय चंद्रचूड यांनी पदाची शपथ दिली. न्यायमूर्ती कोटीश्वर सिंग यापूर्वी जम्मू - काश्मीर आणि लडाख उच्च न्यायालयात कार्यरत होते, तर न्यायमूर्ती आर महादेवन मद्रास उच्च न्यायालयात कार्यरत होते.

<><><><><>

हिंसाचार आणि हत्या अशा शब्दांचा वापर अल्पकालीन राजकीय फायद्यासाठी केला जातो हे दुर्दैवी असल्याचं भाजपाचे प्रवक्ते सुधांशु त्रिवेदी यांनी म्हटलं आहे. ते नवी दिल्लीत बातमीदारांशी बोलत होते. यावेळी त्यांनी नकारात्मक राजकीय वातावरण, देशाची सुरक्षा आणि त्याचा परिणाम याकडेही लक्ष वेधलं. लोकसभेतले विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी अनेक वेळा प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्याबद्दल अपमानास्पद वक्तव्य केल्याचा आरोपही त्रिवेदी यांनी केला.

<><><><><>

गडचिरोली जिल्ह्यात छत्तीसगडच्या सीमेलगतच्या जंगलात काल दुपारी पोलिसांबरोबरच्या चकमकीत १२ नक्षलवादी ठार झाले. एटापल्ली तालुक्यात जारावंडी क्षेत्रातल्या जंगलात पोलिसांनी नक्षलवाद्यांविरोधात मोहीम उघडली होती. त्यावेळी नक्षलवाद्यांनी गोळीबार सुरु केला. पोलिसांनीही त्याला चोख प्रत्युत्तर दिलं. या चकमकीत एक पोलीस उपनिरीक्षक जखमी झाले. त्यांना उपचारासाठी नागपूरला नेण्यात आलं असून त्यांची प्रकृती स्थिर आहे.

चकमकीनंतर पोलिसांनी घटना स्थळावरून ३ एके-४७, २ बंदुका, १ कार्बाईन, १ एसएलआर, आणि ७ स्वयंचलित शस्त्र ताब्यात घेतली असून, या परिसरातलं नक्षलवाद विरोधी अभियान आणखी तीव्र केलं आहे.

दरम्यान, या यशस्वी अभियानाबद्दल मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी गडचिरोली पोलिसांचं अभिनंदन केलं असून ही मोहीम गडचिरोली जिल्ह्यातल्या नक्षली कारवायांना आळा घालण्यासाठी निर्णायक ठरेल, असं म्हटलं आहे.

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गडचिरोली पोलिसांच्या कामगिरीची प्रशंसा केली असून, पोलिसांच्या या तुकडीला ५१ लाख रुपयांचं बक्षीस जाहीर केलं आहे.

**<><><><><>**

छत्तीसगडमध्ये विजापूर आणि सुकमा जिल्ह्याच्या सीमेजवळ काल रात्री माओवाद्यांनी केलेल्या हल्ल्यात पोलिसांच्या विशेष कार्यदलाचे दोन जवान शहीद झाले. या परिसरात माओवाद्यांविरोधात शोध मोहीम सुरु होती. त्यावेळी माओवाद्यांनी आई.ई.डी. चा स्फोट केला. या हल्ल्यात जखमी झालेल्या चार जवानांना रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे.

**<><><><><>**

जम्मू आणि काश्मीरमधल्या डोडा जिल्ह्यात आज पहाटे दहशतवाद्यांसोबत झालेल्या चकमकीत दोन जवान जखमी झाले आहेत. जद्दन बटा गावात शोध मोहिमेसाठी उभारलेल्या लष्कराच्या छावणीवर दहशतवाद्यांनी गोळीबार केल्यानंतर ही चकमक सुरू झाली. सुमारे एक तास झालेल्या या चकमकीत जवानांनी दहशतवाद्यांच्या गोळीबाराला चोख प्रत्युत्तर दिलं. दरम्यान, सोमवारी आणि मंगळवारी दहशतवादी हल्ल्यात चार लष्करी जवान शहीद झाल्यानंतर देस्सा आणि आजूबाजूच्या परिसरात व्यापक शोध मोहीम राबवली जात आहे.

**<><><><><>**

रेल्वे सुरक्षा पोलिस दलानं २०१८ ते मे २०२४ पर्यंतच्या ७ वर्षांच्या कालावधीत नन्हे फरिश्ते या नावानं राबवलेल्या मोहिमेत ८४ हजारांहून अधिक बालकांची सुटका केली आहे. काळजी घेण्याची आणि सुरक्षेची गरज असलेल्या मुलांसाठी राबवण्य़ात आलेल्या या खास मोहिमेअंतर्गत सुटका करण्यात आलेल्या बालकांना जिल्हा बाल कल्याण समितीकडे सोपवण्यात आल्याचं रेल्वे मंत्रालयाकडून सांगण्यात आलं. सुटका करण्यात आलेल्यांमध्ये घर सोडून पळून आलेली, बेपत्ता, निराधार, अपहरण करण्यात आलेली, मतिमंद आणि रस्त्यावर राहणाऱ्या मुलांचा समावेश आहे. या वर्षीच्या पहिल्या पाच महिन्यात रेल्वेसुरक्षादलानं चार हजार ६०७ मुलांची सुटका केली असल्याचंही रेल्वे मंत्रालयानं म्हटलं आहे.

**<><><><>**

ईडी अर्थात सक्तवसुली संचलनालयाने बँक घोटाळाप्रकरणी आज दिल्लीसह गुरुग्राम, महेंद्रगड, बहादुरगड आणि जमशेदपुर या शहरांमधे छापा टाकला. १ हजार ३९२ कोटी रुपयांच्या बँक घोटाळा प्रकरणी ईडीनं १५ ठिकाणी ही कारवाई केली. या प्रकरणी हरियाणामधल्या महेंद्रगडचे आमदार रावदान सिंह आणि त्यांच्या कुटुंबीयांविरोधातही  ईडीनं कारवाई केली. मेसर्स अलाइड स्ट्रिप्स लिमिटेड या कंपनीच्या नावे १ हजार ३९२ कोटी रुपयांचं घेतलेलं कर्ज बुडवण्यात आलं होतं. या कंपनीशी रावदान सिंह यांचा संबंध असल्याचं ईडीच्या तपासात आढळून आलं आहे. या प्रकरणाचा तपास ईडीसह सीबीआय करत असून ही कंपनी आणि तिच्या प्रवर्तकांविरोधात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

**<><><><>**

वादग्रस्त आयएएस प्रशिक्षणार्थी पूजा खेडकर यांची आई मनोरमा खेडकर यांना रायगड जिल्ह्यात पौड इथल्या पोलिसांनी काल अटक केली. एका शेतकऱ्याला

बंदूक रोखून धमकावल्याचा आरोप त्यांच्यावर आहे. या प्रकरणी संबंधित शेतकऱ्याच्या तक्रारीवरून पोलिसांनी गुन्हा दाखल केला होता. तेव्हापासून मनोरमा फरार होत्या.

**<><><><><>**

भारताच्या पहिल्या परदेशस्थ जनऔषधी केंद्राचं उद्घाटन परराष्ट्र व्यवहार मंत्री जयशंकर यांनी काल मॉरिशस इथं केलं. यावेळी मॉरिशसचे प्रधानमंत्री प्रविंद कुमार जगनॉथ उपस्थित होते. भारत आणि मॉरिशस यांच्या दरम्यानच्या आरोग्य भागीदारी उपक्रमा अंतर्गत भारतात उत्पादन झालेल्या आणि स्वस्त औषधांचा पुरवठा मॉरिशस मध्ये केला जाईल, अशी ग्वाही जयशंकर यांनी यावेळी केली. त्याआधी जयशंकर यांनी मॉरिशसच्या ग्रँड बोआ परिसरात भारताच्या आर्थिक मदतीच्या आधारे उभ्या केलेल्या मेडिक्लिनिक उपक्रमाचं उद्घाटन केलं.

**<><><><><>**

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष जो बायडन यांना कोविड-1९ चा संसर्ग झाल्यानंतर, अध्यक्षपदाच्या निवडणुकीतून त्यांनी माघार घ्यावी यासाठीचा दबाव वाढत आहे. डेमोक्रॅटिक पक्षाचे प्रभावशाली नेते, तसंच कॅलिफोर्नियाचे प्रतिनिधी ॲडम शिफ यांनी, अध्यक्ष बायडन यांना अध्यक्षपदाच्या शर्यतीतून माघार घेण्याचं जाहीर आवाहन केलं आहे. बायडन यांनी आपल्या वयाशी निगडित आरोग्य आणि स्वास्थ्याचा विचार करून अध्यक्षपदाची निवडणूक लढवली नाही, तर देश आणि डेमोक्रॅटिक पक्षासाठी ते हितकारक ठरेल, असं मत अमेरिकी संसदेच्या बहुसंख्य नेत्यांनी व्यक्त केलं आहे.

अमेरिकेत येत्या नोव्हेंबर मध्ये होणाऱ्या अध्यक्षपदाच्या निवडणुकीत रिपब्लिकन पक्षा**च्या** डोनाल्ड ट्रम्प यांचा सामना करण्यासाठी डेमोक्रॅटिक पक्षानं आपला उमेदवार म्हणून बायडन यांची निवड केली आहे.

**<><><><><>**

आंतरराष्ट्रीय क्रिकेट संघटनेने यंदाची पुरुष टी ट्वेंटी ची क्रमवारी जाहीर केली आहे. झिम्बाब्वेविरुद्ध ४-१ नं  टी-२० मालिका जिंकल्यानंतर भारतीय खेळाडूंनी ताज्या क्रमवारीत वरचं स्थान मिळवलं आहे. फलंदाजीत भारताच्या सूर्यकुमार यादवनं आपलं दुसरं स्थान कायम राखलं आहे, तर यशस्वी जैस्वाल सहाव्या स्थानावर आहे. ऋतुराज गायकवाड क्रमवारीत एका क्रमांकानं  घसरून आठव्या स्थानावर आला आहे. अष्टपैलू खेळाडूंच्या क्रमवारीत, हार्दिक पंड्या हा टॉप टेन मधला एकमेव भारतीय खेळाडू आहे, तर श्रीलंकेच्या वानिंदू हसरंगा यानं आपलं अव्वल स्थान कायम राखलं  आहे.

**<><><><><>**

स्विडीश ओपन टेनिस स्पर्धेच्या उपांत्यपूर्व फेरीत भारताच्या सुमित नागलचा सामना आज अर्जेंटिनाच्या मरियानो नवोने याच्याशी होणार आहे. स्विडनच्या बस्ताद टेनिस स्टेडियमच्या सेंटर कोर्टमध्ये आज दुपारी हा सामना होईल.

**//<><><><><>//**